ePaper

## बारसूमध्ये उद्धव ठाकरेंच्या सभेला परवानगीस नकार



वर्ष - 7 । अंक -10 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- निवडणुका लांबणीवरच!
- खासदार डॉ. कोल्हेंकडे पदाधिकाऱ्यांची पाठ!
- पुतीन यांच्या हत्येचा प्रयत्न?


www.mahaenews.com | शनिवार , दि.6मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शहर राष्ट्रवादीचा आनंदोत्सव!

## » शरद पवारांचा राजीनामा मागे: खराळवाडी येथे कार्यकर्त्यांचा जल्लोष

। पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षाच्या राजवटीत देशांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. अशा वातावरणात शरद पवार यांच्या सारख्या अनुभवी आणि मुत्सद्दी नेत्यांची देशाला गरज आहे. त्यामुळे पवार साहेबांनी पक्षाचे अध्यक्ष पद सोडू नये, अशी आमच्या सारख्या कार्यकर्त्यांनी तीव्र भावना होती. पवार साहेबांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.**

शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा माघार घेतल्याबद्दल शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने खराळवाडी येथील पक्ष कार्यालयात शुक्रवारी (दि.5) सायंकाळी फटाके फोडून, पेटे वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी गव्हाणे बोलत होते. आनंदोत्सवाला शहराध्यक्ष अजित गव्हाणे , माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, कार्याध्यक्ष राहुल भोसले, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख आदींसह पक्षाचे माजी नगरसेवक व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**» कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केल्याबद्दल पवार साहेबांचे आभार - अजित गव्हाणे**

**» शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या फटाके फोडून, पेटे वाटून आनंदोत्सव साजरा**



### पवारसाहेबांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला...

» गव्हाणे पुढे बोलताना म्हणाले की, पवार साहेबांनी पक्षाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्यातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात दुःख झाले होते. त्यांनी राजीनामा मागे घ्यावा, म्हणून अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले होते. तर मुंबईत पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या आंदोलन सुरू होते. तसेच नवीन अध्यक्ष निवडीसाठी समिती नेमली होती. मात्र, समितीच्या सर्व सदस्यांनी पवार साहेबांनीच पक्षाच्या अध्यक्षपदी कायम राहावे, अशी मागणी करत राजीनामा फेटाळला. अखेर पवार साहेबांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करून राजीनामा मागे घेतल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.

# पोलीस आयुक्तांचा स्वागतार्ह 'ट्विटर संवाद'!

## » नागरिकांची समस्या घेतल्या समजून : पोलीस-नागरिक सुसंवादावर भर

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी ट्विटरद्वारे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांशी शुक्रवारी (दि. 5) सायंकाळी ट्विटरवर लाईव्ह येत संवाद साधला. या संवादात नागरिकांनी शहरातील वाहतूक व्यवस्था, गुन्हेगारी, पोलीस ठाणे आणि चौक्यांचे बळकटीकरण, प्रतिबंधात्मक कारवाया आणि अन्य विविध विषयांवर प्रश्न उपस्थित केले.**

पिंपरी-चिंचवड शहराला प्रथमच आयआयटीची पार्श्वभूमी असलेले पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या रूपाने मिळाले आहेत. शहरातील पोलिसिंगच्या बाबतीत उपयोग काही बदल करणे आवश्यक असल्याचे प्रतिक कारंजे यांनी सुचवले.

त्यावर आयुक्तांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाचा वापर औद्योगिक वसाहती आणि आयटी नगरी असलेल्या शहरासाठी होईल, अशी आशा व्यक्त केली.

शहरातील कोयता गँग आणि गुंडगिरी करणाऱ्या गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी विशाल दवणे यांनी केली. त्यावर पोलिसांनी आयुक्तांनी थेट आकडे सादर करत सांगितले की, मागील चार महिन्यात एकूण 59 शस्त्रे व 276 कोयते जप्त करण्यात आले आहेत. तसेच 135 कुख्यात गुंडांवर मोक्का व एमपीडीए अंतर्गत करवाई करण्यात आली आहे.





### दंडात्मक कारवाईवर पोलिसांचा भर

» पोलिसांचा दंडात्मक कारवाईवर अधिक भर आहे. त्याबाबत काहीतरी करा, अशी सूचना संदीप शिंदे यांनी केली. त्यावर पोलीस आयुक्तांनी, "नियमभंग करणाऱ्यांना दंड... आणि वाहतूक नियमनासाठी कटिबद्ध....!!" अशी प्रतिक्रिया दिली. मोठा आवाज करणारे सायलेन्सर जसे जप्त करता, तसेच फॅन्सी नंबर प्लेट देखील जप्त करण्याची मागणी श्रीकांत चव्हाण यांनी केली. त्यावर पोलीस आयुक्तांनी फोटो पोस्ट करत फॅन्सी नंबर प्लेट देखील जप्त करत असल्याचे सांगितले.

### हिंजवडी वाहतूक विभागात अनेक समस्या

» वाहतुकीचे प्रश्न सोडविण्यासाठी हिंजवडी वाहतूक विभाग पूर्णतः अपयशी ठरला असल्याची तक्रार राकेश यांनी केली. त्यावर हिंजवडी परिसरात अनेक संस्था संयुक्तपणे काम करत आहेत. त्यांच्या सोबत पोलीस देखील सर्वसमावेशकपणे काम करत असल्याचे आयुक्तांनी सांगितले.(CHINCHWAD) त्याचबरोबर योगेश जोशी यांनी हिंजवडी आयटी पार्क मध्ये पीक अवर्स मध्ये अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्याचा सल्ला दिला. या सल्ल्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना आयुक्तांनी वाहतूक विभागाला दिल्या आहेत.

# निवडणुका लांबणीवरच!

## स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ऑक्टोबर उजाडण्याची दाट शक्यता

।पुणे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील याचिकेवरील सुनावणी गुरुवारीही न झाल्याने आता सुनावणी तीन जुलैनंतरच होण्याची दाट शक्यता आहे. या याचिकेवरील निर्णय प्रलंबित असल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या किमान ऑक्टोबरपर्यंत लांबणीवर पडण्याची भीती या निमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.**

मुंबई-पुण्यासह राज्यातील ११ महापालिकांची मुदत गेल्या वर्षी १५ मार्चला संपली. पाच महापालिकांची मुदत संपून दोन वर्षांहून अधिक काळ झाला आहे. राज्यातील २५ महापालिकांच्या निवडणुका प्रलंबित आहे. याशिवाय दोन डझनहून अधिक जिल्हापरिषदांचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात राहुल रमेश वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय प्रलंबित आहे. गेल्या महिन्यात १० तारखेला झालेल्या सुनावणीदरम्यान राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी वेळ मागितला होता. त्यानुसार चार मे रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली होती. कोर्टाच्या बोर्डावर बुधवारी रात्री उशिरापर्यंत ही याचिका घेण्यात आली नव्हती. त्यामुळे गुरुवारी ही याचिका न्यायालयासमोर आलीच नाही



सर्वोच्च न्यायालयास २२ मे ते ३ जुलैपर्यंत सुट्टी आहे. सुट्टीच्या काळात या याचिकेवर सुनावणी होईल, अशी शक्यता कमी आहे. त्यामुळे या याचिकेवर जुलै महिन्यातच सुनावणी घेतली जाईल, अशी अटकळ बांधण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून जुलै-ऑगस्ट महिन्यात जरी या याचिकेवर निर्णय घेतला गेला आणि निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले तरी पावसाळ्यामुळे या निवडणुका ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलल्या जातील, अशी शक्यता अधिक आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका किमान ऑक्टोबरपर्यंत पुढे गेल्याची चर्चा यानिमित्ताने राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सर्वोच्च न्यायालयात 'ओबीसी' आरक्षणाबाबत सुरू असलेल्या याचिकेवर अद्याप निर्णय झालेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने 'ओबीसीं'च्या आरक्षणाचा मार्ग खुला केल्यानंतर या निवडणुका लगेचच होतील, अशी अटकळ बांधण्यात येत होती. मात्र, शिंदे सरकारने प्रभागातील सदस्यसंख्येत केलेल्या बदलांमुळे निवडणुकीच्या सुरू असलेल्या प्रक्रियेस गेल्यावर्षी चार ऑगस्टला स्थगिती देण्यात आली. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने २२ नोव्हेंबरला नव्याने प्रभागरचना करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात दाद मागण्यात आली असून सर्वोच्च न्यायालयाने नव्याने रचना करण्यास स्थगिती दिली आहे.

### प्रभाग रचनेचा गोंधळ

**सर्वोच्च न्यायालयात निवडणुकांबाबत दाखल याचिकेवरील सुनावणी सातत्याने पुढे जात असून, आता जुलै महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून तोपर्यंत प्रभागरचनेचे काम सुरू करण्याची शक्यता नाही. सर्वोच्च न्यायालयाने नव्याने प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले तर ही प्रक्रिया राबविण्यास लागणारा कालावधी पाहता महापालिकांच्या निवडणुका या नक्की कधी होतील, याबाबत संभ्रमच आहे.**

---

# पुण्यात प्रथमच 'स्वॅप लिव्हर ट्रान्सप्लांट'

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

यकृत खराब झालेल्या दोन रुग्णांना यशस्वी प्रत्यारोपनानंतर जीवनदान मिळाले आहे. लिव्हर सिरोसिसने ग्रस्त रुग्णांवर 'स्वॅप यकृत प्रत्यारोपण' शस्त्रक्रिया केली असून दोन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान अशा प्रकारची शस्त्रक्रिया पुण्यात प्रथमच केल्याचा दावा सह्याद्रि रूग्णालयाच्या अवयव प्रत्यारोपण विभागाचे प्रमुख डॉ. बिपिन विभूते यांनी केला आहे.

सह्याद्रि सुपरस्पेशालिटी रूग्णालयात ही शस्त्रक्रिया केली. यात दोन यकृत दाते व दोन रुग्ण असे एकाच वेळी चौघांवर शस्त्रक्रिया केली. यासाठी ११ तज्ज्ञ डॉक्टरांसह २५ जणांचे पथक कार्यरत होते. यासाठी २० तासांचा कालावधी लागला. बुलडाणा येथील शिक्षक अजित रणावरे आणि नाशिकचे व्यावसायिक अमर शिंदे (रुग्णांची नावे बदललेली आहेत) हे दोन्ही रुग्ण यकृताच्या आजाराने त्रस्त होते. उपचारासाठी ते पुण्यातील सह्याद्री रुग्णालयामध्ये दाखल झाले तेव्हा, त्यांची वैद्यकीय चाचणी केल्यानंतर यकृत निकामी झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे त्यांना सांगण्यात आले. यावेळी दोन्ही रुग्णांच्या पत्नींनी यकृत देण्याचे ठरविले. परंतु यात एकमेकांचे रक्तगट जुळत नसल्याने अडचणी येत होत्या. त्यामुळे डॉ. विभूते यांनी द्वि-मार्गी प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला व त्यास दोन्ही कुटुंबांनी सहमती दर्शविली. दोन्ही कुटुंबीयांनी संमती दिल्यानंतर अजित यांच्या पत्नी गीता यांचे यकृत अमर यांच्यावर तर अमर यांच्या पत्नी स्वरा (दोघींची नावे बदललेली आहेत) यांचे यकृत अजित यांच्यावर शस्त्रक्रियेद्वारे प्रत्यारोपित करण्यात आले


---

# वारकऱ्यांना तीर्थ म्हणून प्यावं लागतंय केमिकलसह सांडपाणी मिश्रीत पाणी...!

## इंद्रायणी काठी धक्कादायक प्रकारः इंद्रायणी नदी पात्रात घाणीचे साम्राज्य

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अवघ्या काही दिवसांवर आषाढी एकादशी पालखी सोहळा येऊन ठेपला आहे. त्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांची अलंकापुरीत रेलचेल सुरू झाली आहे. दुसरीकडे इंद्रायणी नदी पात्रात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. इंद्रायणी नदीचे पाणी प्रचंड प्रदूषित झाले आहे. शिवाय या प्रदूषित पाण्यात वारकरी स्नान करतात.**



तसेच इंद्रायणी नदी पवित्र म्हणून अनेक भाविक या नदीचे केमिकल युक्त पाणी देखील पिताना पहायला मिळतात. त्यामुळे भाविकांच्या आरोग्याशी खेळ होत आहे. प्रशासनाकडून देखील याकडे लक्ष दिलं जात नसल्याचं पाहायला मिळतं. त्यामुळे अलंकापुरी जणू इंद्रायणीला काळ्या पाण्याची शिक्षा मिळाली आहे. असेच म्हणावे लागेल.

इंद्रायणीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहे. दुसरा कोणताही उपाय नसल्यामुळे भाविकांना याच पाण्यात आंघोळ करावी लागते. शिवाय काही ठराविक वेळेला संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीला मुखवट्याला देखील इंद्रायणीच्या पाण्याने अभिषेक केला जातो. प्रदूषित पाण्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्या जात आहेत. आळंदी देवस्थान कमिटीने इंद्रायणी प्रदूषण मुक्तीसाठी पिंपरी-चिंचवड मनपा, सांडपाणी नदीत सोडणारी गावे, राज्य सरकार, केंद्र सरकार यांना पत्रव्यवहार देखील केला आहे. मात्र, संबंधितांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. हे या मागचं वास्तव आहे.

यंदाच्या आषाढी वारीच्यावेळी चार ते पाच दिवस लाखो भाविक हे आळंदीत मक्कामी असतील असा अंदाज आहे. त्यावेळी त्यांना स्नान इंद्रायणी नदीत करावं लागतं. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंद्रायणीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झालं आहे त्याचं महत्वाचे कारण म्हणजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील कारखान्यांचे केमिकल मिश्रित पाणी होय. काही ठिकाणचे गावांचे तसेच शहरातील सांडपाणी हे कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्यात असल्याचंही चित्र आहे. याचा वारकऱ्यांना मोठा त्रास होणार आहे. जोपर्यंत इंद्रायणीचे पाणी प्रदूषणमुक्त होत नाही, तोवर आळंदी नगरपरिषदेने इंद्रायणी घाटावर दर्शनी भागावार 'इंद्रायणीचे पाणी पिऊ नका' असे फलक लावणे आवश्यक आहे .

इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त व्हावी यासाठी इंद्रायणी सेवा फाउंडेशनच्या वतीने १ मेपासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. जोपर्यंत इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त होत नाही तोपर्यंत हे उपोषण सुरू राहणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितलं आहे.

# खासदार डॉ. कोल्हेंकडे पदाधिकाऱ्यांची पाठ!

## भाजपा प्रवेशाच्या चर्चांमुळे फटका : शहर राष्ट्रवादीचा पाय आणखी खोलात

। पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रदेश पातळीवर अध्यक्षपदाबाबत मोठी खलबतं सुरू असताना खासदार अमोल कोल्हे या संपूर्ण घडामोडींपासून अलिप्त आहेत. त्यातच पिंपरी-चिंचवडमधील पत्रकार परिषदेकडेही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पाठ फिरवल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे कोल्हे यांच्या करिता आगामी लोकसभा निवडणूक निश्चितपणे आव्हानात्मक ठरणार, हे स्पष्ट झाले आहे.**








पिंपरी-चिंचवडमधील भोसरी विधानसभा आणि शहराशी जोडून असलेला खेड विधानसभा मतदार संघात सुमारे ८ लाख मतदान आहे. २०१९ मध्ये निवडणुका झाल्यापासून कोल्हे या भागात अपवाद वगळता फिरकले नाहीत. ठराविक कार्यकर्त्यांच्या उद्घाटनांचा 'फार्स' सोडला, तर कोल्हे यांनी पिंपरी-चिंचवडकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील किंवा विरोधी पक्षनेते अजित पवार शहरात आल्यानंतर जसा स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा गराडा दिसतो. तसे डॉ. कोल्हे यांच्याबाबत होत नाही.

पूर्वी अमोल कोल्हे म्हणजे शहर राष्ट्रवादीसाठी 'फायरब्रँड' नेता म्हणून जवळचे वाटत होते. भाजपाविरोधी डॉ. कोल्हे यांची प्रभावी वक्तृत्वाची तोफ चालवण्याची भूमिका स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ठेवली होती. मात्र, 'व्हाय आय किल्ड गांधी' चित्रपटानंतर राजकीय चित्र बदलले. डॉ. कोल्हे राष्ट्रवादीच्या संघटनात्मक कार्यक्रमांपासून दूर राहिले. आता महानाट्याच्या निमित्ताने पुन्हा डॉ. कोल्हे राष्ट्रवादीच्या प्रदेश पातळीवर घडामोडींमध्ये कुठेही दिसत नाही. महानाट्य 'शिवपुत्र संभाजी' च्या प्रयोगांना महाराष्ट्रभरातून प्रतिसाद मिळत आहे. पण, डॉ. कोल्हे राष्ट्रवादीपासून दुरावत आहेत, असे चित्र आहे.

### माजी आमदार विलास लांडे राष्ट्रवादीचे उमेदवार?

डॉ. अमोल कोल्हे भाजपात गेल्यास युतीची ताकद वाढेल. त्यांना युतीची उमेदवारी मिळाल्यास मी स्वत: त्यांचा प्रचार करेल, असा दावा माजी खासदार आणि डॉ. कोल्हे यांचे कट्टर प्रतिस्पर्धी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केला आहे. त्यामुळे डॉ. कोल्हेंच्या महायुतीच्या उमेदवारीला एकप्रकारे आढळरावांनी अनुमती दिल्याचे मानले जाते. त्यामुळे राष्ट्रवादीला शिरुर लोकसभा मतदार संघात नवा उमेदवार शोधावा लागणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सामान्य जनता आणि निष्ठावंत शिवसैनिकांची साथ आहे. तसेच, शिरुर लोकसभा मतदार संघातील सहापैकी पाच विधानसभांमध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे निष्ठावंत म्हणून भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांना लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी किंवा राष्ट्रवादीची उमेदवारी मिळू शकते, असे भाकीत राजकीय जाणकारांनी वर्तवले आहे. त्यामुळे आगामी काळात होणारी राजकीय उलथापालथ आणि राष्ट्रवादीची भूमिका याबाबत उत्सुकता वाढली आहे.

### चार वर्षांचा कार्यकाळ असमाधानकारक?

**महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात डॉ. कोल्हे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि शहरात काही कार्यक्रम, बैठकांना हजेरी लावली. प्रशासनाला सूचनाही केल्या. मात्र, चार वर्षांच्या कार्यकाळात शहराचे खासदार म्हणून कोल्हे यांना पिंपरी-चिंचवडशी संबंधित एकही केंद्रातील प्रश्न मार्गी लावता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे २०१९ मध्ये स्थानिक राष्ट्रवादीसाठी 'फायरब्रँड' असलेले डॉ. कोल्हे आता राजकीयदृष्ट्या नुकसानकारक वाटतात. परिणामी, कार्यक्रम, बैठकांमध्ये डॉ. कोल्हे यांना आमंत्रित करण्याबाबत उदासीनता आहे. शहरात झालेल्या पत्रकार परिषदेला 'नेता आणि अभिनेता' असा रंग असला, तरी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी शहराचे खासदार म्हणून उपस्थित राहणे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. त्यामुळे डॉ. कोल्हे आगामी महापालिका, विधानसभा निवडणुकांमध्ये शहरात 'कॅम्पेनिंग' करतील का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

---

# भक्ती अन् ज्ञानाचे उर्जाकेंद्र संतपीठ!

## अध्यक्ष शेखर सिंह यांची भावना : मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षणाला सुरुवात

।पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**संगीत वाद्यांच्या कंपनामधून निघणाऱ्या लहरींचा मोठा परिणाम जीवनावर होत असतो. त्यामुळे ती कंपने आपण दिर्घकाळापर्यंत जपून ठेवली पाहिजेत. 'संतपीठ हे मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण देणारे अद्वितीय माध्यम ठरेल' असे विचार महापालिकेचे आयुक्त तथा चिखलीतील संतपीठाचे अध्यक्ष शेखर सिंह यांनी व्यक्त केले.**



महापालिका संचलित चिखलीतील जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ येथे मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षणाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष तथा संतपीठाचे संचालक ह.भ.प.डॉ. सदानंद मोरे उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त तथा संतपीठाचे अध्यक्ष शेखर सिंह यांच्या हस्ते झाले. माजी महापौर उषा ढोरे, आळंदी देवस्थानचे विश्वस्त तथा संतपीठाचे संचालक ह.भ.प. डॉ. अभय टिळक, वारकरी शिक्षण संस्था आळंदीचे विश्वस्थ ह.भ.प. दिनकर शास्त्री भुकेले आदी उपस्थित होते.

अभय टिळक यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठाच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंतच्या प्रगतीचा आलेख मांडत असताना " भक्ती हा संतांच्या जीवनाचा प्राण असला तरी त्या भक्तीला ज्ञानाचा अधिष्ठान असलेल्या निरंतर शिक्षणाचे उगमस्थान किंवा उर्जाकेंद्र म्हणजे संतपीठ असेल" असे गौरवोद्गार काढले.

माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, दिनेश यादव, संतोष मोरे, वृक्ष प्राधिकरन समितीचे सदस्य आनंदा यादव, टाळगांव चिखली प्रासादिक दिंडीचे अध्यक्ष रोहिदास मोरे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश मळेकर, विनायक मोरे, तसेच संतपीठाच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक ह.भ.प. राजु ढोरे यांच्यासह संतपीठ सांस्कृतिक, चिंतन, अभ्यासक व सल्लागार समितीचे सदस्य तसेच टाळगांव चिखलीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतपीठाचे अभ्यासक प्राचार्य ज्ञानेश्वर गाडगे यांनी केले. तर, संतपीठाच्या प्रभारी प्राचार्या स्नेहल पगारे यांनी आभार मानले.

### संतपीठ आदर्श ठरणार : शेखर सिंह

**'मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षणाच्या माध्यमातुन लहान थोरांना अध्यात्मिक व्यासंग प्राप्त होणार आहे. अध्यात्मिक शिक्षण देणारे टाळगांव चिखली येथे साकारले गेलेले संतपीठ याचा एक आदर्श नमुना ठरेल, असे ढोरे म्हणाल्या. आमदार महेश लांडगे यांनी दुरुभाष्य प्रणाली द्वारे आपला शुभेच्छा संदेश पाठविल्या. मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षणाच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. तसेच वारकरी शिक्षण संस्थेचे विश्वस्त दिनकर शास्त्री भुकेले यांनी देखील सर्व उपस्थिताांच्या वतीने प्रातिनिधीक स्वरुपात या संकल्पनेस शुभेच्छा दिल्या.**

# शिवपुराण कथेचा दुष्काळ मंत्रतंत्र,तोडग्यांचा सुकाळ



भूमिका

मध्य प्रदेशात सिहोर येथे रुद्राक्ष वाटपात अनेक भाविकांना आपले प्राण गमवावे लागल्यावर स्वाभाविकच पंडित प्रदीप मिश्रा कोण आहेत ? याची उत्सुकता लागली आणि त्यांच्या बाबत माहिती घ्यावी म्हणून युट्युबवर त्यांच्या प्रवचन,कथांचे व्हिडीओ शोधायला सुरुवात केली तेव्हा बरेच काही हाताला लागले. गेल्या महिन्यात हिंगोली जिल्ह्यात या महाराजांच्या शिव पुराण कथेला शेवटच्या दिवशी लोटलेली गर्दी बघता ,महाराज नेमके शिवपुराण कथा सांगताना नेमके काय सांगतात हे ऐकण्याचा मोह आवरला नाही. त्यांनी आजवर विविध ठिकाणी केलेल्या कथांचे पन्नासवर व्हिडीओ ऐकल्यावर माझ्या हे पक्के लक्षात आले की शिव कथेचा दुष्काळ अन मंत्रतंत्र,विविध तोडगे आणि उपायांचा मात्र सुकाळ आहे. मिश्राजी कथा कमी अन लोकांच्या प्रश्नांचे निवारण करण्याचा दावा करीत विविध शास्त्र,पुराणांचा हवाला देत कर्मकांडेच भाविकांना सांगत असतात. हे करताना " ये मै नही कह रहा हू,स्कंदपुराण में लिखा है . शिव पुराण में लिखा है " हे सांगण्यास ते विसरत नाहीत.

मिश्राजी म्हणजे सगळ्या समस्या निवारण करण्याची जडीबुटी सोबत घेऊन फिरणारे जादूगार आहेत असे त्यांच्या प्रवचनाच्या क्लिप ऐकल्यावर समजते. जगात अशी कोणतीही समस्या नाही की ज्यांचा उपचार मिश्राजी जवळ नाही असेच त्यांच्या प्रवचनावरून दिसते. विदर्भात अकोला जिल्हा हा सर्वात जास्त समस्याग्रस्त जिल्हा आहे आणि नागरिक तर त्याही पेक्षा पीडित आहेत. अशावेळी मिश्राजी गरजवंत जिल्हयात ५ मे पासून जणू देवदूत बनूनच येत आहेत. पातूर मार्गावरील म्हैसपूर शिवारात त्यांच्या शिव महापुराण कथेची जय्यत तयारी आयोजन समितीने केली आहे. या आयोजनावर किमान १० कोटी रुपयांचा चुराडा होणार असल्याची माहिती आहे. होऊ दे खर्च अश्या अविर्भावात भाविक आयोजनात भिडले आहेत. या पैश्यात कुण्या हजार गरीब,गरजवंताची कायमची समस्या मिटेल असले फालतू तर्क कुणी लावू नयेत कारण हे आयोजन देशाचे हिताचे आहे असा लोकांचा दावा आहे.

प्रदीप मिश्रा प्रवचनात कथा कमी आणि तोडगे जास्त सांगतात,रुद्राक्षाचे महत्व असे रंगवून सांगतात की भाविक रुद्राक्षाच्या प्रेमात पडतात. सगळी कामे बाजूला सारून महाराज सांगतात तो रुद्राक्ष आता घेतलाच पाहिजे या जिद्दीने भाविक पेटतात [ कालांतराने ते सिहोरचे भक्त बनतात हा भाग वेगळा ] सामान्य लोकांना भेडसावणारे नेहमीच्या जगण्यातील प्रश्न,अडचणी तर ते चुटकी सरशी सोडवतात कारण त्यांचे फंडे अतिशय प्रभावी असतात. एका प्रवचनात मिश्राजी म्हणतात भगवान शंकराला दूध,दही,मध,तूप,आणि मिठाई अर्पण करायची असते ती नियमित केली पाहिजे. दूध घरात संपन्नता आणते.दही कुटुंबाला जोडते,मध घरातील चिडचिड समाप्त करते,तूप रोगमुक्ती देते,साखर किंवा मिठाई घरातील धन कायम ठेवते. म्हणूनच शंकराला पंचामृत आवडते. भाविकांनी यापुढे किराणा यादीत या वस्तूंवर स्वतंत्र बजेट ठेवले पाहिजे.

ज्या घरात लोक सतत आजारी असतात त्यांनी अजिबात घाबरू नये महाराज त्यावर पण रामबाण उपाय सांगतात. हनुमानाच्या उलट्या पायाचे कुंकू घेऊन एका आरशावर त्याचे त्रिशूल काढून घ्या,आणि तो त्रिशूल काढलेला आरसा घरात ठेवा ,एका महिन्यात आजार गायब होतील. आता कुणी शहाणा म्हणेल की मग महाराजांना जिल्हा सामान्य रुग्णालयात काही महिने जनसेवार्थ ठेवून घ्या म्हणजे हजारो लोकांचे आजार पळून जातील. खर्च केवळ एवढाच करायचा की हनुमानाच्या उलट्या पायाचे कुंकू आणि आरसा आणायचा. या निमित्याने जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा सर्वोपचार रुग्णालयाचे डीन यांनी असा एखादा प्रस्ताव आयोजन समितीला देण्याचा प्रयत्न केला पाहिजे ,खुपमोठी लोकसेवा होईल आणि पदरात पुण्याच्या राशी लागतील ते बोनस. मिश्राजी उघडपणे आजार,दुःख निवारण कर्जमुक्ती असे कित्येक मार्ग जगाला सांगत असताना शासन त्यांचा फायदा लोकांसाठी का करून घेत नाही ?

भगवान शंकराच्या पिंडीवर दूध,दही,मध असे पंचामृत नियमित अर्पण करण्याचा सल्ला देताना मिश्राजी म्हणतात ,पुराणात असेही लिहिले आहे की शिवाला इतर कोणत्याही गोष्टींची आवड नाही कारण त्यांना सत्य हे सर्वात जास्त आवडते. सत्यं शिवम सुंदरम , मला मिश्राजी याना विचारावेसे वाटते की जर भगवान शिवाला सत्य सर्वात जास्त आवडत असेल तर मग तुम्ही भाविकांना प्रवचनातून हे बंडीभर असत्य कशाला सांगता की शिवलिंगावर अमुकच अर्पण करायला हवे म्हणून. हेच मिश्राजी म्हणतातकी जो शिवभक्त असेल तो कधीच दुखी असू शकत नाही कारण त्याच्या जीवनात भगवान शिव कधीच संकटे येऊ देत नाहीत. हे खरे असेल तर मग शिवाच्या भक्तांनी कोणती कर्मकांडे करावीत यावर मिश्राजी तासंतास का खर्च करतात ? वरून एक लोटा जल शिवाला अर्पण करण्याचा नवा कार्यक्रम भाविकांना का देतात ?

पुढे त्यांनी सांगितलेले फंडे तर फारच चकित करणारे आणि माती गुंग करणारे आहेत. जो विद्यार्थी अनपढ,अडाणी असेल किंवा त्याचे अभ्यासात अजिबात

## संपादकीय »

### अनिवार्य पवार

***पवार पक्षाध्यक्षपदावरुन दूर झाले तर पक्षातील नवी रचना राजकीय समीकरणांकडे कसे पाहील, असा प्रश्न होता. तोच राज्याच्या राजकारणातील अनेक शक्यतांचे सूचन करीत होता. पवारांनी निर्णय मागे घेतल्याने त्याला अटकाव बसला आहे.***

शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय तीन दिवसांनंतर मागे घेतल्याने महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकीय मंचावर रंगलेल्या एका नाट्याला विराम मिळाला.पवार यांच्या राजकारणाचा भल्याभल्यांना अंदाज येत नाही आणि त्यांचे निर्णय, भूमिकांचा अंदाज लावणे सोपे नाही, ही त्यांची प्रतिमा या नाट्याने आणखी गडद केली. त्यांची निवृत्तीची घोषणा समस्त राजकीय विश्वाला धक्का देणारी होती.'राष्ट्रवादी'च्या कार्यकर्त्यांसाठी तो बॉम्बगोळाच होता, यात शंका नाही. त्यासाठी सांगितले जाणारे वय, प्रकृतीचे कारण अर्थातच तकलादू होते. पवार यांनी कधीच वय आणि प्रकृतीची तमा बाळगलेली नाही.

**लोकशाहीत नागरिक आणि सरकार यांचे स्थान सारखेच आहे. स्थानिक नागरिकांकडे असलेली माहिती, त्यांच्याकडे असलेली कौशल्ये यांचा विचारसुद्धा होणे गरजेचे असायला हवे. संवाद आणि विश्वास हा लोकशाहीचा गाभा आहे, तो सरकार आणि नागरिक अशा दोन्ही बाजूंनी कायम राहायला हवा.**

## संवाद आणि विश्वास लोकशाहीचा गाभा



कोकणात रिफायनरी सुरू करण्याच्या प्रश्नावरून सध्या रण माजले आहे. बारसू परिसरातील नागरिक, विशेषत: स्त्रिया मोठ्या प्रमाणात विरोधात उतरल्या आहेत. सरकार आणि लोक यांच्यातील संघर्ष रस्त्यावर आला आहे.

बहुसंख्य लोक प्रकल्पाच्या विरोधात आहेत. पेट्रो केमिकलच्या रासायनिक उद्योगामुळे कोकणातील निसर्गाची, बागायतीची, नुकताच जम बसू लागलेल्या पर्यटन व्यवसायाची आणि लोकजीवनाची वाताहत होईल, अशी साधार भीती त्यांना वाटत आहे.

तशा आशयाचे ठरावसुद्धा अनेक ग्रामपंचायतींनी केले आहेत; तर लोक गैरसमजातून विरोध करत आहेत. काही वाईट तर घडणार नाहीच, उलट कोकणात रोजगारनिर्मिती होईल. त्यामुळे हा प्रकल्प होणारच, अशी भूमिका सरकारची आहे.

या पार्श्वभूमीवर काही जुनेच प्रश्न पुन्हा नव्याने समोर येत आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा- जिथे प्रकल्प होणार, त्या प्रकल्पाचा प्रभाव जिथवर पडणार त्या संपूर्ण परिसरातील नागरिकांना विश्वासात घेण्याचा आहे. सरकारने वरच्या पातळीवर निर्णय घेऊन मग तो लोकांच्या गळी उतरविण्याची पद्धत लोकशाही व्यवस्थेशी मिळतीजुळती नाही.

आता कोणी असेही म्हणेल, की कोणताही प्रकल्प, मग तो कितीही छोटा असो की मोठा, त्याबाबत आवश्यक तो अभ्यास, पाहणी करून मगच तो आधी कागदावर साकारतो, त्याला अनेक खात्यांच्या मंजुरी मिळतात आणि मग तो अस्तित्वात येतो.

हे खरेच आहे. आले मनात की टाकला प्रकल्प, असे होत नाही. ही एक खूप मोठी प्रक्रिया असते. त्याला अनेक टप्पे असतात. प्रश्न इतकाच आहे की नियोजन, संशोधन, विविध खात्यांच्या परवानग्या, गुंतवणूक, उभारणी यांच्याइतकेच महत्त्व स्थानिक नागरिकांचे असायला हवे. लोकशाहीत नागरिक आणि सरकार यांचे स्थान सारखेच आहे. स्थानिक नागरिकांकडे असलेली माहिती, त्यांच्याकडे असलेली कौशल्ये यांचा विचारसुद्धा होणे गरजेचे असायला हवे.

संवाद आणि विश्वास हा लोकशाहीचा गाभा आहे, तो सरकार आणि नागरिक अशा दोन्ही बाजूंनी कायम राहायला हवा. संवाद असला, तर विश्वास बसतो.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवारांनी राजीनामा मागे घेतला!

## अजितदादांची दांडी पण जयंतरावांसाठी शरद पवारांनी प्रेस थांबवली, पाटलांची 'ताकद' दिसली!

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोक माझे सांगाती' हेच माझ्या सार्वजनिक जीवनाचे गमक आहे. माझ्याकडून आपल्या भावनांचा अनादर होऊ शकत नाही. आपण दर्शवलेलं प्रेम आणि विश्वासाने मी भारावून गेलोय. माझ्या निर्णयापासून परावृत्त होण्यासाठी आपल्या सर्वांनी केलेली आवाहने तसेच राष्ट्रवादी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या बैठकीत घेतलेला निर्णय जो माझ्यापर्यंत पोहोचवला गेला, या सर्वांचा विचार करुन मी पुन्हा अध्यक्षपदी राहावे, या निर्णयाचा मान राखून मी माझा निर्णय मागे घेत आहे, असं सांगतच ज्येष्ठ शरद पवार यांनी आपला राजीनामा मागे घेत असल्याची घोषणा केली. ते वाय बी चव्हाण प्रतिष्ठाण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते.... ज्या क्षणासाठी गेल्या चार दिवसांपासून वाट पाहत होते तो क्षण अखेर आला आणि पवारांनी राजीनामा मागे घेतल्याची घोषणा होताच पत्रकार परिषदेत टाळ्यांचा कडकडाट झाला. शरद पवारांनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्वात प्रबळ नेते आणि पवारांचे पुतणे अजित पवारच गैरहजर राहिल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. पण असं असतानाही शरद पवारांनी पत्रकार परिषदेला सुरुवात करण्याआधी जयंत पाटील कुठे आहेत असा सवाल केला आणि या सगळ्यात पुन्हा एकदा चर्चेला आले ते सांगलीचे जयंतराव.... पत्रकार परिषदेआधी नेमंक काय घडलं?

शरद पवारांच्या पत्रकार परिषदेची वेळ म्हणजे घडाळ्याचा ठोका ना इकडे होत ना तिकडे. पण यावेळी मात्र वेगळंच घडलं. त्याचं कारणं ठरले ते राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील. पत्रकार परिषदेची वेळ आधी ५ वाजताची दिली होती. मग वेळेत बदल झाला आणि पत्रकार परिषद ५.३० वाजता होईल, असं पक्षाकडून सांगितलं गेलं. या सगळ्यात ५.१५ वाजेपर्यंत सगळे नेते वाय.बी सेंटर झाले होते.

पत्रकार परिषदेस्थळी सुप्रिया सुळेंनी सगळी पाहणी करत सर्वांना बसण्याची व्यवस्था योग्य आहे ना... याची तपासणी केली. तेवढ्यातच बाहेर शरद पवारांचं आगमन झालं. थोड्याच वेळात पवार आतमध्ये आले. सर्व मीडियाचं लक्ष अजितदादांच्या उपस्थितीकडे होतं. पण दादा काही आले नाही. दुसरीकडे शरद पवार आले तरी जयंत पाटीलही उपस्थित झाले नव्हते. संशयाची पाल चुकचुकली... शरद पवारांनी स्थानापन्न झाल्यानंतर बाजूला असलेल्या प्रफुल्ल पटेल यांना पहिला सवाल केला- जयंत पाटील आले नाहीत..? त्यावर प्रफुल्ल पटेल म्हणाले.. निघालेत... पोहचतीलच काही मिनिटांत. पवारांनी विचारलेला हाच सवाल सर्वाच्या भुवया उंचवणारा ठरला.

**अन शरद पवार स्थानापन्न झाले...**

पवारांचं लक्ष होतं ते जयंत पाटील यांच्या उपस्थितीकडे... त्यांचे डोळे लागलेले ते डाव्या बाजूला असलेल्या दरवाजाकडे... अखेर शरद पवारांनीच माईक घेत समोर बसलेल्या मीडियाला सांगून दिलं. जयंतराव पाटील येतायंत.... इथे जवळच आहेत... कॉर्नरला आहेत.. दोन तीन मिनिटं वाट पाहिल्यानंतर जयंतराव आले, असा आवाज कोणीतरी दिला आणि पवारांनी मान फिरवली. जयंत पाटील आल्यानंतर थेट शरद पवारांच्या खुर्चीच्या शेजारी आले, तिथेच स्थानापन्न झाले. आणि मग शरद पवारांनी बोलायला सुरुवात केली.

जयंत पाटलांचं पक्षातील वजन

एकीकडे अजितदादांची पत्रकार परिषदेला असलेली अनुपस्थिती हा राजकीय वर्तुळासाठी चर्चेला विषय ठरलेला असला पवारांनी मात्र जयंत पाटलांसाठी ५ मिनिटे पत्रकार परिषद थांबवली... त्यामुळे जयंत पाटलांचं पक्षात वजन किती आहे, तेच यावरुन दिसून येतं.

**नव्या जबाबदाऱ्या सोपवणार, नवीन नेतृत्व निर्माण करणार**

### शरद पवार काय म्हणाले?

» राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला होता. जबाबदारीतून मुक्त व्हावे, अशी माझी इच्छा होती. परंतु मी घेतलेल्या निर्णयाची जनमाणसामध्ये तीव्र भावना उमटली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी, माझे सांगाती असलेल्या जनतेमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. मी निर्णयाचा फेरविचार करावा, माझे हितचिंतक, निस्वार्थी प्रेम करणारे कार्यकर्ते, अससंख्य चाहते यांनी संघटित होऊन एकमताने, काहींनी प्रत्यक्ष भेटून मला आवाहन केलं. देशभरातून विशेषत: महाराष्ट्रातून विविध पक्षाचे नेते कार्यकर्ते यांनी मी अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा घ्यावी, अशी विनंती केली. या निर्णयाचा मान राखून मी माझा निर्णय मागे घेत आहे, असं सांगतच ज्येष्ठ शरद पवार यांनी आपला राजीनामा मागे घेत असल्याची घोषणा केली.

### नेते, कार्यकर्त्यांच्या हट्टापुढे शरद पवार यांची माघार

» पवारांनी गठित केलेल्या निवड समितीची शुक्रवारी सकाळी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सगळ्या सदस्यांनी एकमताने शरद पवार यांचा राजीनामा फेटाळून लावला. त्यानंतर या सगळ्या सदस्यांनी सिल्वर ओकवर जाऊन शरद पवार यांची भेट घेतली. यावेळीही सदस्यांनी पवार यांची मनधरणी केली. घोषणा केली.

मी पुनश्च: अध्यक्षपद स्वीकारत असलो तरी संघटनेमध्ये कोणतेही पद अथवा जबाबदारी सांभाळणारे उत्तराधिकारी निर्माण होणे आवश्यक असते असे माझे स्पष्ट मत आहे. माझ्या पुढील कार्यकाळात पक्षामध्ये संघटनात्मक बदल करणे, नव्या जबाबदाऱ्या सोपविणे, नवीन नेतृत्व निर्माण करणे यावर माझा भर असेल. यापुढे पक्षवाढीसाठी तसेच पक्षाची विचारधारा व ध्येयधोरणे जनमाणसांपर्यंत पोचवण्यासाठी मी अधिक जोमाने काम करीन.

आपण सातत्याने दिलेली साथ हीच माझी खस प्रेरणा आहे. माझ्या जीवनातील यशापशायात, सर्व प्रकारच्या आव्हानांशी मुकाबला 'करतेवेळी आपण माझे सांगाती राहिलात याबद्दल मी आपला कायम ऋणी राहिल. मी पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारत असल्याचे पुनश्च: जाहिर करतो. धन्यवाद...

**समितीने एकमताने राजीनामा फेटाळला**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांचा राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा राजीनामा सर्वानुमते समितीने नामंजूर केला. राष्ट्रीय पक्षाध्यक्षपदी शरद पवारच कायम रहावेत हीच समितीच्या सदस्यांची सामूहिक भावना आहे. त्यामुळे लोकांच्या भावनेचा आदर करुन शरद पवार यांनी राजीनामा परत घ्यावा, अशी मागणी गठित केलेल्या निवड समितीच्या सदस्यांनी खुद्द पवार यांच्याकडे केली.

# माझा बाप 'स्ट्राँग', पण तेव्हा तो खचून गेला!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जीवनातील प्रसंग सांगताना श्रीकांत शिंदे भाऊक

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी वडील व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आयुष्यातील काही प्रसंगाबाबत खुलासा केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सगळ्यात जास्त काळजी कधी वाटली? या प्रश्नाला उत्तर देताना श्रीकांत शिंदे यांना भावना आवरता आल्या नाहीत. कुटुंबात घडलेल्या एका प्रसंगामुळे माझे वडील पूर्णपणे खचून गेले होते, असं विधान श्रीकांत शिंदे यांनी केलं.

खरं तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांची 'एबीपी माझा'ने मुलाखत घेतली. या मुलाखतीतून शिंदे पिता-पुत्रांनी विविध राजकीय आणि वैयक्तिक आयुष्यावर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं दिली. दरम्यान, श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या दोन भावांच्या मृत्यूचा प्रसंग सांगितला. यावेळी त्यांना





आपल्या भावना आवरता आल्या नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सगळ्यात जास्त काळजी कधी वाटली? या प्रश्नाला उत्तर देताना श्रीकांत शिंदे म्हणाले, "जेव्हा आमच्या परिवारात तो प्रसंग (एकनाथ शिंदे यांच्या दोन मुलांचा मृत्यू) घडला, तेव्हा मला वडिलांची खूप काळजी वाटली. एकनाथ शिंदेंना मी लहानपणापासून पाहायचो, माझा बाप स्ट्राँग आहे, असं मला वाटायचं. पण त्या प्रसंगाच्या वेळी ते पूर्णपणे ढासळून गेले. तेव्हा मी खूप लहान होतो. तो क्षण शब्दांत मांडू शकत नाही."

> "मला वाटतं एकनाथ शिंदेंनी त्यावेळ कणखर भूमिका घेतली नसती, तर त्या परिस्थितीतून बाहेर येणं, खूप कठीण झालं असतं. दिघे साहेबांनी त्यांना मदत केली नसती, किंवा त्यांच्या मागे उभे राहिले नसते, तर आज एकनाथ शिंदे जिथे आहेत, तिथे त्यांना पाहता आलं नसतं," असंही श्रीकांत शिंदे म्हणाले. "जेव्हा दहा महिन्यांपूर्वी बंडखोरीची घटना घडली, तेव्हाही काळजी वाटत होती. हे दोन आयुष्यातील सगळ्यात जास्त व्यथित करणारे क्षण आहेत.
>
> -श्रीकांत शिंदे, खासदार

# पुतीन यांच्या हत्येचा प्रयत्न?

## अध्यक्ष निवासावरील ड्रोन हल्ल्यानं खळबळ; युक्रेनवर आरोप

।मॉस्को। महाईन्यूज।

**रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या हत्येचा प्रयत्न झाल्याचा आरोप रशियन सरकारनं युक्रेनवर केला आहे. पुतीन यांच्या हत्येसाठी क्रेमलिनवर ड्रोन हल्ला करण्यात आल्याचा दावा रशियाकडून करण्यात आला आहे. या हल्ल्यात पुतीन यांना काहीही झालेलं नाही. ते पूर्णपणे सुरक्षित आहेत. युक्रेननं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या निवासस्थानावर हल्ला केल्याचा आरोप रशियाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे एकच खळबळ माजली आहे. यामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी ताणले जाण्याची शक्यता आहे.**

पुतीन यांच्या हत्येसाठी काल रात्री दोन ड्रोनच्या माध्यमातून हल्ले करण्यात आल्याची माहिती रशियाकडून देण्यात आली आहे. हा दहशतवादी हल्ला असल्याचं रशियानं म्हटलं आहे. युक्रेनचे दोन्ही ड्रोन पाडण्यात आल्याची माहिती रशियानं दिली आहे. '९ मे रोजी विजयी दिनाचं संचलन होईल. त्या पार्श्वभूमीवर पुतीन यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला. मात्र पुतीन पूर्णपणे सुरक्षित आहेत. आम्हाला प्रत्युत्तरादाखल कारवाई करण्याचा अधिकार आहे. ड्रोन हल्ल्यानंतरही ९ मे रोजी विजयी दिनाचं संचलन होईल,' असं रशियाकडून सांगण्यात आलं आहे.



आतापर्यंत कोणत्याही देशानं दोन्ही देशांच्या अध्यक्षीय निवासांना किंवा त्यांच्या कार्यालयांना लक्ष्य केलेलं नव्हतं.

### ड्रोन हल्ल्यांनी क्रेमलिनचे नुकसान...

» मॉस्कोच्या आतमध्ये ड्रोन पोहोचणं फारसं अवघड नाही. पण पुतीन यांचं निवासस्थान असलेल्या क्रेमलिनपर्यंत ड्रोन पोहोचणं रशियाच्या दृष्टीकोनातून चिंतेचा विषय आहे. युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांनी क्रेमलिनचं किती नुकसान झालं आहे, याबद्दलची नेमकी माहिती समजू शकलेली नाही.

मात्र आता रशियन अध्यक्षांच्या निवासस्थानावर हल्ला झाल्यानं परिस्थिती तणावपूर्ण बनवी आहे. या परिस्थितीत रशिया-युक्रेन युद्ध लवकरच निर्णायक टप्प्यावर पोहोचेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

मॉस्कोपासून युक्रेनची सीमा जवळपास ६०० किलोमीटर अंतरावर आहे. हे अंतर कापण्यासाठी कोणत्याही ड्रोनला काही मिनिटांचा कालावधी लागतो. याआधीही युक्रेनचे अनेक ड्रोन मॉस्कोच्या जवळ पोहोचले आहेत. एप्रिलच्या अखेरीस युक्रेनचा UJ-२२ ड्रोन नोंगिस्कच्या जंगलात दिसला होता. हे जंगल मॉस्कोच्या सीमेपासून अगदी जवळ आहे. या ड्रोनमध्ये कॅनडानं पाठवलेलं स्फोटक सापडलं. ड्रोनमध्ये १७ किलो M११२ स्फोटक होतं.

---

# पाकिस्तानात होतेय पालींची सर्रास कत्तल

### रस्त्याशेजारी विकलं जातंय चरबीचं तेल

।इस्लामाबाद। महाईन्यूज।

पाकिस्तानची आर्थिक स्थिती अतिशय वाईट आहे. देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेली आहे. देशावर कर्जाचा डोंगर असल्यानं अर्थव्यवस्थेचं दिवाळं वाजलं आहे. पाकिस्तानच्या बाजारांमध्ये सध्या पालीच्या चरबीपासून तयार करण्यात येणारं तेल विकलं जात आहे.

पालीची चरबी, विंचवाचं तेल आणि मिरची यांच्या मिश्रणापासून तयार होणारं तेल सर्रास विकण्यात येत आहे. महागाई वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानमध्ये चित्रविचित्र घटना घडत आहेत. पाकिस्तानी पुरुष पाली, विंचू यांचा वापर करत आहेत. आपला स्टॅमिना वाढवण्यासाठी, पौरुषत्व वाढवण्यासाठी पाकिस्तानी पुरुषांनी प्राण्यांचा वापर सुरू केला आहे.

पाकिस्तानात व्हायग्रावर बंदी आल्यामुळे आता पुरुष मंडळी त्याला पर्याय म्हणून पालींचा वापर करत आहेत. पालीच्या चरबीचा वापर पौरुषत्व वाढवण्यासाठी केला जात



आहे. पाकिस्तानात सांडे प्रजातीच्या पालींची कत्तल केली जात आहे. तिची चरबी, विंचवाचं तेल आणि लाल मिरची एकत्र करून सांड्याचं तेल तयार केलं जात आहे. या तेलामुळे स्टॅमिना वाढत असल्याचा दावा करण्यात येतो. रावळपिंडीच्या राजा बाजारमध्ये हा व्यवसाय जोरात सुरू आहे. रस्त्यावर बसून अनेक जण सांड्याचं तेल विकत आहेत.

बीसीसीच्या वृत्तानुसार, सांड्याचे तेल विकणारे ग्राहकाच्या समोरच पालीला चाकूनं कापतात. तिच्या शरीरातून चरबी बाहेर काढतात. यामुळे ग्राहकांचा विश्वास बसतो. सांड्याच्या तेलामुळे पौरुषत्व वाढतं या दाव्यात तथ्य नाही. डॉक्टर या दाव्याला दुजोरा देत नाहीत. वैद्यकीय पातळीवर, शास्त्रीय निकषांवर हा दावा सिद्ध झालेला नाही.

# करोनाबाबत जागतिक आरोग्य संघटनेकडून मोठी घोषणा!

## कोव्हिड-19 आता सार्वजनिक जागतिक आरोग्य आणीबाणी राहिलेला नाही

।पणजी। महाईन्यूज।प्रतिनिधी।

**तब्बल चार वर्ष संपूर्ण जगभरात ज्यामुळे मोठी उलथापालथ झाली. ज्यामुळे संपूर्ण जग त्रस्त झालं होतं, त्या करोनाला जागतिक आरोग्य संघटनेने आणीबाणीच्या वर्गवारीतून वगळलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे की, कोव्हिड-१९ आता सार्वजनिक जागतिक आरोग्य आणीबाणी राहिलेला नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या आपत्कालीन समितीच्या १५ व्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.**

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक डॉ. टेड्रोस अद्यनोम गेब्रेयसस म्हणाले, “काल (गुरवार, ४ मे) आपत्कालीन समितीची १५ वी बैठक पार पडली.

यावेळी, माझ्याकडे शिफारस करण्यात आली की, मी जगभरात कोव्हिड-१९ आता जागतिक आरोग्य आणीबाणी राहिलेली नाही याबाबतची घोषणा करावी. मी त्यांचा सल्ला स्वीकला असून याबाबतची घोषणा करत आहे.”

जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलं की, ३० जानेवारी २०२० रोजी कोव्हिड-१९ ला त्यांनी जागतिक आणीबाणी जाहीर केलं होतं. ही घोषणा केली तेव्हा चीनमध्ये केवळ १०० करोनाबाधित रुग्णांची नोंद झाली होती. तोवर करोनामुळे एकही मृत्यू झाला नव्हता. परंतु तीन वर्षांनंतर ही संख्या ७० लाखांच्या पुढे गेली. आमच्या अंदाजानुसार या रोगामुळे आतापर्यंत जगभरात २ कोटींहून अधिक लोकांनी प्राण गमावले असावेत.

### करोना संपला नाही...

» यावेळी डॉ. टेड्रोस यांनी हेदेखील स्पष्ट केलं की, करोना या रोगाला जागतिक आरोग्य आणीबाणीच्या कक्षेतून वगळलं असलं तरी याचा अर्थ असा नाही की, करोना संपला आहे. गेल्या आठवड्यात करोनामुळे दर तीन मिनिटाला एका व्यक्तीचा जीव जात होता. आताही करोनाबाधित रुग्ण आढळत आहे. तसेच या रोगाचे वेगवेगळे व्हेरिएंट समोर येत आहेत. त्यामुळे आपण सतर्क राहिलं पाहिजे.



# हनी सिंगबरोबरच्या डेटिंगच्या अफवांवर नुसरत भरुचाने सोडले मौन

बॉलिवूडमध्ये स्टार्सच्या अफेअरच्या बातम्या येत असतात. दोन्ही स्टार एकत्र दिसले नाहीत की लोक त्यांच्या डेटिंगबद्दल अंदाज लावतात. सध्या गॉसिप कॉरिडॉरमध्ये नुसरत भरुचाचे नाव यो यो हनी सिंगसोबत जोडले जात आहे.

मीडिया रिपोर्ट्समध्ये असे म्हटले जात आहे की नुसरत रॅपर-गायक हनी सिंगला डेट करत आहे. खरं तर, नुकत्याच एका कार्यक्रमानंतर दोघे हातात हात घालून फिरताना दिसले. यानंतरच त्यांच्या अफेअरच्या बातम्यांना उधाण येऊ लागले, ज्यावर नुसरतने मौन सोडले आणि तिला काही फरक पडत नसल्याचे सांगितले.

नुकतेच एका मीडिया मुलाखतीदरम्यान नुसरतने तिच्या चित्रपट आणि करिअरबद्दलही सांगितले. 'ड्रीम गर्ल 2'चा भाग नसल्याबद्दलही अभिनेत्रीला प्रश्न विचारण्यात आला होता. नुसरत भरुचा आयुष्मान खुरानाच्या 'ड्रीम गर्ल' (2019) चित्रपटात दिसली होती.

आता या चित्रपटाचा सिक्वेल बनवला जात आहे, मात्र नुसरत यात नाही. जेव्हा नुसरतला 'ड्रीम गर्ल 2' चा भाग नसल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा तिने अगदी साधेपणाने उत्तर दिले.

सरत भरुचा म्हणाली, 'तुम्ही जेव्हा एखादा चित्रपट करता, ज्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतो, तेव्हा तुम्हीही त्याच्याशी जोडले जाता. 'ड्रीम गर्ल'सोबत नेहमीच एक खास कनेक्शन असेल. यादरम्यान अभिनेत्रीने आयुष्मानचे



जोरदार कौतुकही केले.

आयुष्मान खुरानाचे कौतुक करताना नुसरतने सांगितले की, 'त्याच्यासोबत काम करणे हा एक मजेदार अनुभव होता. या फिल्मी दुनियेतला मी प्रामाणिकपणे जवळचा मित्र म्हणते. मी आजारी पडल्यावर माझी काळजी घेणारा तो एकमेव व्यक्ती आहे.'

हनी सिंगसोबतच्या तिच्या अफेअरबद्दल नुसरत म्हणाली की, 'तिला अशा बातम्यांची काहीच अडचण नाही, कारण तिला या सर्व गोष्टींचा फरक नाही पडत. लोकांना आयुष्यात कोणतेही काम नाही आणि त्यांच्या कल्पनेला मर्यादा नसते.'

वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर नुसरत लवकरच 'छत्रपती' चित्रपटात दिसणार आहे. सध्या अभिनेत्री या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. हा चित्रपट 12 मे रोजी रिलीज होणार आहे.

# 'खतरो के खिलाडी'मध्ये दिसणार डेझी शाह...

बॉलिवूडचा सुप्रसिद्ध दिग्दर्शक रोहित शेट्टी त्याच्या ॲक्शन चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहे. कलाकार त्याच्या चित्रपटांमधील जबरदस्त ॲक्शन सीक्वेन्सद्वारे दीर्घकाळापासून चाहत्यांची मने जिंकत आहेत. यानंतरही त्याचे मन भरले नाही, म्हणून त्याने 'खतरों के खिलाडी' हा धोकादायक स्टंट शो आणला.

शोचे 12 सीझन सुपरहिट झाले असून आता 13व्या सीझन ऑन एअर होण्याची तयारी सुरू आहे. आता या शोमधील नवीन सहभागींची नावे समोर आली आहेत.

रोहित शेट्टीच्या 'खतरों के खिलाडी' शोच्या 13व्या सीझनसाठी एकामागून एक स्टार्सची नावे समोर येत आहेत. यामध्ये सलमान खानच्या शो बिग बॉसचे शिव ठाकरे आणि अर्चना गौतम KKK 13 मध्ये सामील होण्याची शक्यता आहे.



आता या यादीत सलमान खानच्या चित्रपटातील एका अभिनेत्रीचे नावही जोडले गेले आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर, अभिनेत्री डेझी शाह देखील या शोमध्ये दिसणार आहे.

डेझी शाह बऱ्याच काळापासून चित्रपटांमध्ये सक्रिय आहे, ती दक्षिण आणि बॉलीवूड चित्रपटांचा भाग आहे आणि सलमान खानसोबत तिची चांगली बाँडिंग देखील आहे. आता ही अभिनेत्री रोहित शेट्टीच्या शोमध्ये धोकादायक स्टंट करताना दिसणार आहे. यावेळी शोमध्ये सहभागी होणाऱ्या स्टार्सची नावं समोर आली असून शेवटचं नाव डेजी शाहचं असल्याचं समजतंय. तिच्याशिवाय रुही चतुर्वेदी, अंजुम फेक, अंजली आनंद, रोहित बॉय रॉय आणि अरिजित तनेजा यांच्या नावांचा समावेश आहे.खतरों के खिलाडीचे शेवटचे दोन सीझन केपटाऊनमध्ये शूट झाले होते. मात्र शोच्या नव्या सीझनच्या शूटिंगसाठी नवीन ठिकाण निवडण्यात आले आहे. यावेळी हा शो अर्जेंटिनामध्ये शूट होणार आहे. हा शो सामान्य शोपेक्षा खूपच वेगळा असल्याने स्पर्धकांनी तयारी सुरू केली आहे.

# "माझी आई चाळीत राहायची: पलक तिवारी



अभिनेत्री श्वेता तिवारीची लेक पलक तिवारी ही कायमच चर्चेत असते. नुकतंच तिचा 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटात प्रदर्शित झाला. या चित्रपटाद्वारे तिने सिनेसृष्टीत पदार्पण केले. नुकतंच पलकने दिलेल्या एका मुलाखतीत आई श्वेता तिवारीच्या खडतर प्रवासाबद्दल सांगितले आहे. पलकने नुकतंच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या आईच्या संघर्षाबद्दल खुलासा केला आहे. "माझी आई ही रुढीवादी कुटुंबातून आली आहे. तिच्या अभिनेत्री होण्याच्या निर्णयावर कुटुंबातील सदस्यांनी नाराजी व्यक्त केली होती. माझ्या आईने खूप वाईट काळ पाहिला आहे. तिचा यशाचा आलेख हा कायमच उत्कृष्ट राहिला आहे. तिने तिच्या जीवनातील बऱ्याच गोष्टींमध्ये सुधारणा केली आहे", असे पलक तिवारीने म्हटले.

"माझी आई श्वेता ही एका चाळीत राहत होती. तिचे घर फार लहान होते. त्यात आजोबा, माझी आजी, माझे मामा आणि माझी आई राहत होते. माझी आई राहत असलेली खोली फक्त एक बेडरुमची होती. माझ्या आईची सुरुवात तिथूनच झाली. त्यामुळेच कोणतीही गोष्टी या सहजासहजी येत नाही. त्यामुळे या हलक्यात घेऊ नका", असेही पलकने म्हटले.

"तिला त्याकाळी भावी पिढीसाठी काहीतरी करायला हवं, हे कळले होते आणि तिने त्यानुसार पावलं उचलली. माझी आजी जरी माझ्या आईला यात साथ देऊ शकत नसली तरी तिने जमेल तशी मदत तिला केली", असेही तिने सांगितले. दरम्यान, श्वेता तिवारीने १९९८ मध्ये राजा चौधरीशी लग्न केलं होतं. त्यानंतर २००० मध्ये पलकचा जन्म झाला, पलकला श्वेताने एकटीने वाढवलं, त्यानंतर तिने २०१२ मध्ये पहिल्या पतीपासून घटस्फोट घेतला व २०१३ मध्ये अभिनव कोहलीशी लग्न केलं. पण तिचं दुसरं लग्नही फक्त ९ वर्षे टिकलं.

# अनुष्का शर्मा 'कान्स फिल्म फेस्टिवल'मध्ये करणार पदार्पण

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा कोणत्या ना कोणत्या कारणाने नेहमी चर्चेत असते. मेट गाला २०२३ मध्ये आलियाच्या पदार्पणानंतर अनुष्का कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये डेब्यू करणार असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या फेस्टिवलमध्ये अनुष्काबरोबर टायटॅनिक अभिनेत्री केट विन्सलेटही दिसणार आहे.गेल्या वर्षी, दीपिका पदुकोणने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये आपल्या लूकने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. ती कान्स ज्युरीचा भाग होती. यावर्षी अनुष्का शर्मा कान्समध्ये पदार्पण करणार असल्याची चर्चा आहे. भारतातील फ्रान्सचे राजदूत इमॅन्युएल लेनेन यांनी ट्विटरवर विराट कोहली आणि अनुष्कासोबतचा एक फोटो शेअर केला असून, अनुष्काच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभागी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.फ्रान्सच्या राजदूतांनी लिहिले की, "विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांना भेटून आनंद झाला. मी विराट आणि टीम इंडियाला आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत आणि अनुष्काच्या कान फिल्म फेस्टिव्हलच्या सहलीबद्दल चर्चा केली आहे."



'कान्स चित्रपट महोत्सव' यावर्षी १६ मे ते २७ मे दरम्यान होणार आहे.अनुष्का कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभागी होणार असल्याची बातमी सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. यापूर्वी, दीपिका, ऐश्वर्या राय बच्चन, सोनम कपूर आणि इतर अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी कान्सच्या रेड कार्पेटवर हजेरी लावली आहे.

# राजस्थान रॉयल्सचा सुपडा साफ!

## गुजरात टायटन्सचा तब्बल नऊ गडी राखून दणदणीत विजय

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या ४८व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा सामना गुजरात टायटन्सशी होत आहे. दोन्ही संघांमधील हा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळला जात आहे. राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

राजस्थानचा संघ १७.५ षटकांत ११८ धावांत गारद झाला. धावांचा पाठलाग करताना गुजरातने १३ षटकात ९ गडी राखून राजस्थान रॉयल्सचा सुपडा साफ केला. या दणदणीत विजयासह ते गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहचले आहे. दुसरीकडे राजस्थानला रनरेटमध्ये खूप मोठा फटका बसला आहे.

राजस्थानचा संघ १७.५ षटकांत ११८ धावांत गारद झाला. प्रत्युत्तरात गुजरातने १३.५ षटकांत एका विकेटच्या मोबदल्यात ११९ धावा करून सामना जिंकला. लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने चांगली सुरुवात केली. वृद्धिमान साहा आणि शुभमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी ९.४ षटकांत ७१ धावांची भागीदारी केली. शुबमन गिल ३५ चेंडूत ३६ धावा करून बाद झाला. गिल बाद झाल्यानंतर ऋद्धिमानने कर्णधार हार्दिक



पांड्यासोबत सामना संपवला. साहाने ३४ चेंडूंत पाच चौकारांच्या मदतीने नाबाद ४१ धावा केल्या. त्याचवेळी हार्दिकने १५ चेंडूत ३९ धावा करून नाबाद राहिला. त्याने तीन चौकार आणि तीन षटकार मारले.

गुजरात टायटन्सने जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध शानदार विजय मिळवला आहे. त्याचा हा मोसमातील सातवा विजय आहे. त्याचे आता १० सामन्यांत १४ गुण झाले आहेत. गुजरातचा संघ केवळ तीन सामने हरला आहे. दुसरीकडे, या पराभवानंतर राजस्थान चौथ्या स्थानावर आहे. त्याचे १० सामन्यांत १० गुण आहेत. राजस्थानचे पाच विजय आणि पाच पराभव झाले आहेत

### राजस्थान रॉयल्सचा डाव


» प्रथम फलंदाजी करताना राजस्थानची सुरुवात पुन्हा चांगली झाली नाही आणि जॉस बटलर केवळ ८ धावा करून बाद झाला. त्याला हार्दिक पांड्याने मोहित शर्माच्या हाती झेलबाद केले. सॅमसन आणि जैस्वाल यांनी दुसऱ्या विकेटसाठी जलद ३६ धावा जोडल्या, पण यशस्वी ११ चेंडूत १४ धावा करून दुर्दैवाने धावबाद झाला. लवकरच, राजस्थानला आणखी एक धक्का बसला जेव्हा कर्णधार संजू सॅमसन १९ चेंडूत ३० धावा करून जोशुआ लिटलच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर, राजस्थानने वारंवार अंतराने विकेट गमावल्या आणि परिणामी, संघ संपूर्ण षटक देखील खेळू शकला नाही आणि १७.५ षटकात ११८ धावा करून बाद झाला.

# विराट की धोनी, कोणाच्या नेतृत्त्वाखाली खेळणार?

## आयपीएलमध्ये डेब्यू करण्याआधी माजी कर्णधाराशी घेतला पंगा

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेटमध्ये जेव्हा जेव्हा कर्णधारपदाचा उल्लेख केला जातो तेव्हा महेंद्रसिंग धोनीचे नाव प्रथम घेतले जाते, ज्याने भारताला तीन आयसीसी ट्रॉफी जिंकवून दिल्या आणि या अर्थाने तो भारताचा सर्वात यशस्वी कर्णधार होता. मात्र, आकडेवारीचा विचार करता धोनीचा उत्तराधिकारी विराट कोहली विजयाच्या टक्केवारीच्या बाबतीत धोनीच्या पुढे आहे. या दोघांनी आपापल्या कर्णधारपदाखाली भारताचा झेंडा जगभर फडकवला आणि अनेकांना आपल्या नेतृत्वक्षमतेची खात्री पटवून दिली.



आयपीएलच्या अस्तित्वामुळे अनेक परदेशी खेळाडूंनाही या दोघांच्या नेतृत्वाखाली खेळण्याची संधी मिळाली आणि आजही या दोघांच्या नेतृत्वाखाली खेळण्याची इच्छा असलेले अनेक खेळाडू आहेत. या यादीमध्ये सामील झालेला इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूटनेही या दोघांच्या नेतृत्वाखाली खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे. राजस्थान रॉयल्सचा फलंदाज रूट याने दोन खेळाडूंमधून आपला आवडता कर्णधार निवडला असून ज्याच्या नेतृत्वाखाली त्याला खेळायचे आहे. जो रूटने एम.एस. धोनीला पहिली पसंती दिली

राजस्थान रॉयल्सच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये, जो रूट त्याचे सहकारी देवदत्त पडिक्कल आणि ध्रुव जुरेल यांच्यासह तो दिसत आहे. हे तिघे मिळून दिस आणि दॅट नावाचा गेम खेळत आहेत. गेममध्ये, त्या खेळात खेळ खेळणाऱ्याला दोन प्रश्नांसह दोन पर्याय दिले जातात, ते पाहून त्यांना उजवीकडे किंवा डावीकडे वळावे लागते. त्या व्हिडिओत अनेक प्रश्न विचारले गेले त्यात एक प्रश्न कर्णधाराव होता की, तुम्हाला कोणाच्या कर्णधारपदाखाली खेळायचे आहे, तर जो रूटने धोनीच्या पर्यायाकडे वळत आपली इच्छा व्यक्त केली. माहितीसाठी, जो रूटचा राजस्थान रॉयल्सच्या प्रभावशाली खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे, परंतु तो अद्याप मैदानात उतरलेला नाही. आयर्लंड विरुद्धच्या एकमेव कसोटी आणि अॅशेस मालिकेसाठी आयपीएल २०२३ मधून इंग्लंडचे खेळाडू लवकरच मायदेशी परततील. जर आपण चालू असलेल्या आयपीएल२०२३ मध्ये राजस्थानच्या कामगिरीबद्दल बोललो, तर संजू सॅमसनचा संघ गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर आहे आणि त्यांचा सामना आज म्हणजेच ५ मे रोजी गुजरात टायटन्सशी होणार आहे. हार्दिक पांड्याचा संघ सध्या जबरदस्त फॉर्म मध्ये असला तरी मागील सामन्यात तळाच्या दिल्ली कॅपिटल्स संघाकडून त्यांना पराभव स्विकारावा लागला आहे.

# ऋषभ पंत लवकरच टीम इंडियात दाखल होणार?

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कोट्यावधी भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी एक चांगली बातमी आहे. गतवर्षी डिसेंबर महिन्यात टीम इंडियाचा दिग्गज खेळाडू ऋषभ पंतचा अपघात झाला होता. या अपघातात पंतला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर पंतने शस्त्रक्रिया केली आणि काही वेळ विश्रांती घेतली. त्यानंतर बंगळुरुच्या राष्ट्रीय क्रिकेट अकॅडमीत जाऊन पंतने फिटनेसवर विशेष लक्ष दिलं. अशातच आता पंतचा एक नवीन व्हिडीओ समोर आल्याने चाहत्यांना आनंद झाला आहे.

ऋषभ पंतने त्याच्या दुखापती मात केली आहे. असं हा व्हिडीओ पाहिल्यानंतर नक्कीच म्हणता येईल. पंत याआधी स्टँडचा आधार घेऊन चालत होता. पण आता कोणत्याही आधाराशिवाय तो स्वत:च्या पायाने चालू शकतो, कारण पंतचा टेबिल टेनिस खेळतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. पंतचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

ऋषभचा अपघात झाल्यानंतर एका युजरने ट्विटरवर पोस्ट शेअर करत म्हटलं होतं की, आमचा चॅम्पियन खेळाडू ऋषभ पंतचा अपघात झाला. तो लवकर बरा होण्यासाठी मी देवाकडे प्रार्थना करतो." दुसऱ्या नेटकऱ्याने म्हटलं, ऋषभसाठी प्रार्थना करत आहे. सुदैवाने तो अपघातात बचावला. लवकर बरा हो चॅम्प." तसंच अन्य एका युजरने म्हटलं, ऋषभ लवकर बरा होण्यसाठी प्रार्थना करते, "गेट वेल सून चॅम्प". भाऊ लवकर बरा हो.

